दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ●मंगळवार दि.१२ ऑगस्ट २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २५७ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Tuesday 12 August 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 257 ● Pages 4 ● Rate 4 Rs



प्रतिनिधी नेमणे आहे

लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.


# मतचोरी विरोधात ३०० खासदारानंसह राहुल गांधी रस्त्यावर

## केंद्रामध्ये इंडिया आघाडीनं मोदी सरकारविरोधात पुकारला एल्गार

## खासदार आणि पोलिसांमध्ये जोरदार धुमश्चक्री

### निवडणूक आयोगाविरोधात विरोधी पक्ष एकवटले

केंद्रामध्ये इंडिया आघाडीनं मोदी सरकारविरोधात एल्गार पुकारला. राहुल गांधींनी निवडणूक आयोग आणि केंद्र सरकारवर मतचोरीचा आरोप केल्यानंतर इंडिया आघाडी मैदानात उतरली. यावेळी पोलिसांनी मोर्चाला परवानगी न दिल्यानं आंदोलक आणि पोलिसांमध्ये जोरदार धुमश्चक्री पाहायला मिळाली. निवडणूक आयोगावर धडक देणाऱ्या मोर्चाला पोलिसांनी आडकाठी केली, पोलिसांनी मोर्चेकऱ्यांना ताब्यात घेतलं आणि पुन्हा संसदेत सोडलं. देशातील प्रत्येक मतदार स्वच्छ आणि निष्पक्ष मतदार यादीची मागणी करत असल्याचं यावेळी राहुल गांधींनी म्हटलं.




**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

मतचोरी संबंधी सादर केलेली सर्व माहिती ही निवडणूक आयोगाने दिलेल्या कागदपत्रांच्या आधारेच करण्यात आली आहे, ती माहिती माझी नाही. त्यामुळे मी त्यावर शपथपत्र का देऊ?असा प्रश्न काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला.राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर थेट मतचोरीचे आरोप केले आहेत. त्यावर आयोगाने त्यांना स्वाक्षरी केलेले शपथपत्र सादर करण्याची सूचना दिली होती .

निवडणूक आयोगाच्या पवित्र्यावर बोलताना राहुल गांधी म्हणाले, निवडणूक आयोगाने त्याच्याकडे असलेली सर्व माहिती त्यांच्या वेबसाइटवर टाकावी, सर्वांना कळेल. हा फक्त मुद्द्यांपासून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न आहे. ही समस्या केवळ बंगळुरूमध्येच नाही, तर अनेक मतदारसंघांत झाली आहे.

### भारताच्या लोकशाहीची दुर्दशा

विरोधी पक्षांचे ३०० खासदार निवडणूक आयोगाला एकच दस्तऐवज देण्यासाठी जाणार होते, पण त्यांना रोखण्यात आले. कारण निवडणूक आयोगाला भीती आहे की, एवढे खासदार तिथे गेले तर निवडणूक आयोगाची खोटी बाजू उघडी पडेल असा आरोप राहुल गांधींनी केला.

राहुल गांधी पुढे म्हणाले की,ही लढाई आता केवळ राजकीय राहिलेली नाही, तर संविधान आणि 'एक मतदार-एक मत' या तत्त्वासाठीची लढाई आहे. कर्नाटकमध्ये आम्ही स्पष्ट दाखवून दिले की, तिथे 'मल्टीपल मॅन, मल्टीपल वोट' झाले. पूर्ण विरोधक या अन्यायाविरुद्ध एकत्र लढत आहेत. आता आयोगासाठी हे लपवणे कठीण जाईल.

### इंडिया आघाडीच्या सहकाऱ्यांचे आभार

राहुल गांधींनी इंडिया आघाडीतील सर्व सहकारी खासदारांचे एकजुटीने मतचोरी विरोधातील लढ्यात सहभागी झाल्याबद्दल आभार मानले. त्यांनी सोशल मीडियावर लिहिले की, ही केवळ राजकीय लढाई नाही, तर लोकशाही आणि मतदानाच्या अधिकाराच्या संरक्षणासाठीची लढाई आहे, आणि आपण सर्व मिळून ती जिंकू.

## अहमदनगर पोस्ट ऑफिस मध्ये पत्रव्यवहार आणि स्पीड पोस्ट साठी लांबच लांब रांगा



**अहमदनगर । ईश्वर निमसे**

मागील १० दिवसा पासून पोस्ट ऑफिस नवीन ऑनलाईन प्रणाली सिस्टीम बदल झाल्या मुळे नागरिकांनची गैरसोय झालेली आहे.पूर्ण दिवस रांगेत उभा राहून पोस्ट ऑफिस चे काम करण्यासाठी वेळ द्यावा लागत आहे.इतर पोस्ट ऑफिस वर नवीन प्रणाली अद्याप जोडलेली नाहीं त्यामुळे सर्व अतिरिक्त लोड जिल्हा कार्यालया वर येत आहे त्यात तांत्रिक अडचणी येत असल्यानं कामकाज वेळो वेळी बंद राहत आहे. त्यामुळे नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे.साधारण स्पीड पोस्ट साठी सहा ते सात तास रांगेत उभा राहावा लागते यावर त्वरित उपाय शोधावा अतिरिक्त काउंटर चालू करून नागरिकांना या त्रासातून मुक्त करावे असे नागरिक मागणी करत आहेत.

## घनकचरा व्यवस्थापनातील कंत्राटी कामगारांनो ताकदीने आंदोलनात सहभागी व्हा-राजेशकुमार जोगदंड

### आंदोलन स्थगीत करण्याचे पत्र देण्याच्या मुख्याधिकारी यांच्या सुचनेला उपमुख्याधिकारी यांनी धुडकावले

**बीड । प्रतिनिधी**

रोजंदारी मजदूर सेनेचे केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर यांच्या सह संघटनेचे पदाधिकारी कामगार प्रतिनिधी च्या शिष्टमंडळाने शुक्रवारी दिनांक ८ ऑगस्ट रोजी दुपारी ४:३० वा. नवनियुक्त नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांची भेट घेतली होती . शहरातील नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित विविध समस्यांबाबत सविस्तर चर्चा करून मागील ०२ वर्षांपासून घनकचरा व्यवस्थापनातील १५० कंत्राटी कामगारांना अयोग्य व बेकायदेशीररित्या कामावरून कमी केल्याने शहरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. सदरील कामगारांना तात्काळ कामावर रुजू करून घ्यावे या व ईतर मागणी करीता टप्प्या टप्प्याने आंदोलन छेडण्याचा ईशारा निवेदनातुन देण्यात आला होता . परंतु नगर परीषदेचे मुख्याधिकारी यांनी शिष्टमंडळा सोबत सविस्तर चर्चा करत योग्य ती कार्यवाही करु व आंदोलन स्थगीत करुन प्रशासनास सहकार्य करावे तसे संघटनेस लेखी पत्र देण्याचे उप मुख्याधिकारी यांना निर्देश देण्यात आले होते , परंतु आज पर्यंत पत्र प्राप्त झाले नसल्याने रोजंदारी मजदुर सेनेचे केंद्रिय महा सचिव भाई गौतम आगळे सर यांच्या नेतृत्वाखाली मंगळवार दिनांक १२ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता नगरपरिषद बीड समोर प्रस्तावित आंदोलन छेडण्यात येणार आहे . तमाम कंत्राटी कामगारांनी आपला लढा यशस्वी करण्यासाठी आंदोलनात संपुर्ण ताकदीने सामील व्हावे असे आवाहन रोजंदारी मजदुर सेनेचे मराठवाडा अध्यक्ष भाई राजेशकुमार जोगदंड यांनी प्रसिद्धी पत्रकातुन केले आहे .

## राहुल गांधी हरतात तेव्हाच आरोप करतात-एकनाथ शिंदे

**मुंबई (वृत्तसंस्था)**-निवडणूक आयोगाने भाजपसोबत मिळून निवडणूक चोरल्याचा आरोप काँग्रेस नेते आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज केला. महाराष्ट्रात ४० लाख संशयित नावे असल्याचा दावाही त्यांनी केला. यावरून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शिवसेना शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के यांनी राहुल गांधींवर निशाणा साधला. राहुल गांधी हरतात तेव्हा आरोप करतात, हा त्यांचा करंटेपणा असल्याची टीका एकनाथ शिंदे यांनी केली. तर राहुल गांधी हे बालिषपणासारखे आरोप करत असून, तो त्यांचा पोरकटपणा असल्याचे नरेश म्हस्के म्हणाले.

राहुल गांधी यांची आज नवी दिल्लीत पत्रकार परिषद झाली. त्यात त्यांनी लोकसभा व विधानसभा निवडणुकीत मतांचा मोठा घोटाळा झाल्याचा आरोप केला. महाराष्ट्राचे निकाल पाहिल्यानंतर निवडणूक चोरीला गेल्याचा आमचा संशय निश्चित झाला असल्याचा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला आहे. मशीन रीडेबल मतदार यादी न देऊन, निवडणूक आयोगाने



भाजपशी संगनमत करून महाराष्ट्र निवडणूक चोरली आहे याची आम्हाला खात्री पटली असल्याचे त्यांनी म्हटले आहे. यावरून आता सत्ताधारी राहुल गांधींना लक्ष्य करत आहेत.


SMKD Education Society's

MKD Arts, Commerce, Science & Fashion Designing College

Virchak,Tal.Dist.Nandurbar

Mail ID : mkdsrcollege@gmail.com

Affiliated : North Maharashtra University, Jalgaon

(Non Grant Basis)

WALK-IN-INTERVIEW

APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS :- College Code : 220130

| Sr.No | Designation | Total | Qualification |
|---|---|---|---|
| 1 | Principal | 01 | M.A./M.Sc., NET/SET/(Ph.D.) Min 15 Years Teaching Experience. |
| 2 | Asst.Prof.Marathi | 03 | M.A.NET/SET/Ph.D. |
| 3 | Asst.Prof.Hindi | 02 | M.A.NET/SET/Ph.D. |
| 4 | Asst.Prof.English | 04 | M.A.NET/SET/Ph.D. |
| 5 | Asst.Prof.Economics | 03 | M.A.NET/SET/Ph.D. |
| 6 | Asst.Prof.Political Science | 01 | M.A.NET/SET/Ph.D. |
| 7 | Asst.Prof.Geography | 01 | M.A.NET/SET/Ph.D. |
| 8 | Asst.Prof.BBA | 04 | M.B.A. NET/SET/Ph.D. |
| 9+ | Asst.Prof.Chemistry | 10 | M.Sc. NET/SET/Ph.D. |
| 10 | Asst.Prof.Physics | 05 | M.Sc. NET/SET/Ph.D. |
| 11 | Asst.Prof.Mathematics | 02 | M.Sc. NET/SET/Ph.D. |
| 12 | Asst.Prof.Botany | 06 | M.Sc. NET/SET/Ph.D. |
| 13 | Asst.Prof.Zoology | 04 | M.Sc. NET/SET/Ph.D. |
| 14 | Asst.Prof.Physical Director | 01 | M.P.Ed. NET/SET/Ph.D. |
| 15 | Librarian | 01 | M.Lib. NET/SET/Ph.D. |
| 16 | Asst.Prof.B.C.A. | 03 | M.C.A. NET/SET/Ph.D. |
| 17 | Asst.Prof.B.Com | 03 | M.Com NET/SET/Ph.D. |
| 18 | Asst.Prof.B.Sc. (Computer Science | 02 | M.Sc.Computer Science NET/SET/Ph.D. |

1. Qualification, Experience & Pay scale for all these post will be as per norms of Govt. of Maharashtra, North Maharashtra University, Jalgaon
2. Application along with attested photocopies of all Relevant Documents Should Reach to the Principal by Mail on or by hand, speed post at Address To., The Principal MKD Arts, Commerce, Science & Fashion Designing College, Navapur Road, Waghale Phata, Nandurbar-425412

SECRETARY


### विनायकराव मेटे साहेब यांच्या पुण्यतिथी निमित्त

## शासकीय रुग्णालयात डॉक्टर आणि रुग्णांना सर्जिकल गाऊनचे वाटप

### शिवसंग्राम विद्यार्थी आघाडीच्या वतीने शासकीय रुग्णालयात डॉक्टर आणि रुग्णांना सर्जिकल गाऊनचे वाटप

**बीड । प्रतिनिधी**

लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांचे दि.१४ ऑगस्ट रोजी पुण्यस्मरण आहे. त्यानिमित्त शिवसंग्राम विद्यार्थी आघाडीने सामाजिक उपक्रम राबविण्याचे ठरवले आहे. यावेळी बीड येथील शासकीय रुग्णालयात डॉक्टर आणि रुग्णांना सर्जिकल गाऊनचे वाटप करण्यात आले आहे. या प्रसंगी

शिवसंग्राम विद्यार्थी आघाडीचे कार्याध्यक्ष मनीष सुहास पाटील, अमोल नवले, अनिकेत साळवे, उत्कर्ष कुलकर्णी, विक्की गिरी आदी उपस्थित होते. लोकनेते विनायक मेटे यांची पुण्यतिथी विविध समाज उपयोगी उपक्रमांनी साजरा व्हावी.



त्यांच्या विचारांचा वसा आणि वारसा पुढे घेऊन जात डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांच्या सूचनेनुसार पुण्यतिथी निमित्त मेटे साहेबांना अभिप्रेत सामाजिक उपक्रम राबत त्यांच्या स्मृतिदिनी सामाजिक उपक्रम राबवत त्यांना अनोख्या पद्धतीने श्रद्धांजली अर्पण करण्याचा मानस शिवसंग्राम विद्यार्थी आघाडीने घेतला याचाच भाग म्हणून शासकीय रुग्णालयात डॉक्टर आणि रुग्णांना सर्जिकल गाऊनचे वाटप करण्यात आले आहे.

## केजडी नदीच्या बंधाऱ्या वरून पाणी वाहू लागले



**केज । गौतम बचुटे**

केज येथे झालेल्या दमदार पावसाने केजडी नदीवर असलेला कोल्हापुरी बंधारा ओसंडून वाहू लागला आहे.दि. ११ ऑगस्ट रोजी केज दुपारी ३:०० वा. च्या सुमारास जोरदार पाऊस पडला. त्या पावसाने केज येथील केजडी नदीला पाणी आले असून केजडी नदीवर असलेला कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा ओसंडून वाहू लागला आहे. नदीला पाणी आल्याने मासे पकडणारे हौशी लोक मासे पडण्यासाठी गर्दी करू लागले आहे. तर या वर्षीच्या हंगामात प्रथमच नदीला पाणी आल्याने बघ्यांनी गर्दी होत आहे.

संपादकीय

# अतिरेक नको!



कबुतर हे खरं तर शांततेचे प्रतीक. पण, या शांततेच्या प्रतीकानेच सध्या मुंबईत अशांतता निर्माण झाली आहे. शांतता, अहिंसा आणि जीवदयेवर अतोनात श्रद्धा असलेल्यांना आपल्या या श्रद्धेच्या समर्थनार्थ हातात चाकू-सुरे घ्यावे लागत आहेत! 'अहिंसेच्या रक्षणार्थ हिंसा झाली तरी हरकत नाही' यासारखी विधानंही कोणी करू लागले आहेत!! आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ भाषा वापरतानाही विवेकाची पातळी सोडू नये, ही शिकवण हल्ली लोप पावत चालली आहे. शिवाय, परमतसहिष्णुता म्हणूनही काही गोष्ट असते. दया, करुणा सहिष्णुतेची अनेक अंगं, अनेक आविष्कार आहेत. त्यातलं कुठलं एक दर्शनच खरं, तेच अंतिम असं मानणं म्हणजे 'विश्वाचं अंतिम सत्य आपल्यालाच उमगलं' असा दावा करण्यासारखं आहे. हा दावा कोणाला करायचा असेल, तर हरकत नाही. पण, त्यातून आपण आपल्यालाच परमपूजनीय असलेल्या महापुरुषांच्या पुढे जातो आहोत, हे समजून घेतलेलं बरं. उच्चरवात आक्रमक बोलणं हा सध्याच्या जमान्याचा रिवाजच झाला आहे. ज्यांची आत्मशांती हरवली आहे, असे लोक बाहेर अधिकाधिक वरच्या पट्टीत जातात. सर्वसामान्यांसाठी हे ठीक आहे. पण, ज्यांनी आपलं संपूर्ण आयुष्य आत्मशांतीच्या शोधार्थ, आत्मिक अध्यात्मासाठी समर्पित केलं आहे, त्यांनी तरी समाजाला याचं भान दिलं पाहिजे. आपला तोल ढळणार नाही, याची काळजी स्वतःच घेतली पाहिजे. कबुतरांच्या विष्ठेने आणि त्यांच्या पंखांनी होणारं प्रदूषण आणि त्यातून माणसाला होणारे विकार राहिले बाजूला; त्याआधी हे प्रदूषण थांबवा, असं म्हणण्याची वेळ आली आहे. कबुतर हा संपूर्ण शाकाहारी पक्षी आहे, या धारणेपोटी त्याला शाकाहारी समाजात, विशेषतः जैन समाजात विशेष स्थान आहे. जैन समाजाच्या या धारणेपोटीच मुंबईत कबुतरखान्यांचा उगम झाला असावा. मुंबईत सध्या ५१ अधिकृत कबुतरखाने आहेत. याशिवाय जैन समाजाची वस्ती जिथेजिथे वाढत जाते, तिथेतिथे या कबुतरखान्यांची संख्याही वाढत जाताना दिसते. अशा अनौपचारिक कबुतरखान्यांची संख्या यापेक्षा अधिक असण्याची शक्यता आहे. खाण्यास आयतं आणि मुबलक मिळत असल्याने मुंबईतील कबुतरांची संख्या झपाट्याने वाढते आहे. गेल्या तीन वर्षांत ही संख्या दीडशे टक्क्याने वाढल्याने अतिसंख्येचे प्रश्न निर्माण झाले आहेत. विधान परिषदेत पावसाळी अधिवेशनात त्याचीच चर्चा झाली. त्या चर्चेच्या आनुषंगाने मुंबई महानगरपालिकेने कारवाई करायला घेतली. त्याच्या विरोधातून प्रकरण उच्च न्यायालयात गेलं. उच्च न्यायालयाने कारवाईला स्थगिती देण्यास नकार दिला. कबुतरप्रेमी त्यामुळे आक्रमक झाले आणि 'न्यायालयाला झुगारून देण्या'ची, 'प्रसंगी कायदा हातात घेण्या'ची, 'कबुतरांच्या संरक्षणासाठी हिंसा झाली तरी बेहत्तर' अशा आशयाची विधानं सुरू झाली.

भूतदया, प्राणी-पक्षीप्रेम वाईट आहे, असं कोणीही मनुष्यमात्र म्हणणार नाही. तसं कोणत्याच धर्मात नाही. उलट, पुण्यप्राप्तीचा हा सर्वात सोपा मार्ग सर्वत्र मानला जातो. पुण्यप्राप्तीबरोबरच पत्रिकेतील दोष, ग्रहदोष घालवण्यासाठी, किमानपक्षी त्याची तीव्रता कमी करण्यासाठी तरी असे मार्ग अवलंबावेत, असं सांगितलं जातं. पूर्वी केवळ ज्योतिषी, ग्रह गोलार्धाचे तज्ज्ञ म्हणवणारे असं सांगत असत. आता 'यू-ट्युब'वर याचं पेव फुटलं आहे. पक्ष्यांना दाणापाणी, गाईंना (समस्या गंभीर असेल, तर विशिष्ट रंगाच्या!) चारापाणी, कुत्र्या-मांजरांची सेवा, असे नानाविध प्रकार सांगितले जात असल्याने त्यावर हुकूम उपाय करणाऱ्यांची संख्याही अतोनात वाढू लागली आहे. मुंबई किंवा तत्सम शहरांत त्याचे गंभीर दुष्परिणाम दिसू लागले आहेत. माणसांच्या स्थलांतराने शहरांचे व्याप नियंत्रणाबाहेर गेले आहेतच. त्यात प्राणी-पक्षांच्या वाढत्या संख्येने स्वच्छतेचे, नागरी समस्यांचे नवेच प्रश्न निर्माण होऊ लागले आहेत. सांडपाणी व्यवस्था, स्वच्छतेचा मुळात अभाव आणि त्यात ही नवी भर! अनेकांना याची जाणीव नाही; त्यामुळे, गांभीर्यही नाही. स्थानिक प्रशासनाला या समस्यांना तोंड द्यावं लागत असल्याने नागरी सुव्यवस्थेचा भाग म्हणून त्यांना काही पावलं उचलण्याची निकड भासते आहे. ज्यांना आपलं शहर सुव्यवस्थित, नेटकं असावं असं वाटतं, त्यांनी या यंत्रणांची भूमिकाही समजावून घेतली पाहिजे. कबुतरांचा त्रास नको, म्हणून स्वतःच्या घराला जाळ्या लावणाऱ्यांनी सार्वजनिक उपद्रवाचा विषयही समजून घेतला पाहिजे. कबुतरांची विष्ठा आणि पंखांचा मानवी आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांची चर्चा वैद्यकीय भाषेत यापूर्वी झाली आहे. जेव्हां हे प्रमाण अति होतं, त्यावेळी होणारा दुष्परिणामही मोठा असतो. तरीही सरकार आणि न्याय यंत्रणेला तज्ज्ञांकडून अधिकृत आणि नेमका अहवाल आवश्यक वाटला, तर तेही योग्यच म्हणावं लागेल. अशा अहवालांच्या आधारेच शास्त्रीय निर्णय झालेला केव्हांही चांगलाच. तोपर्यंत कबुतरांना खायला घालण्याची जबाबदारी महापालिकेने स्वतः घेतली, हेही योग्यच म्हणता येईल. ज्यांना पुण्यच कमवायचं आहे, त्यांच्यासाठी अन्य अनेक मार्ग उपलब्ध आहेत. वैद्यकीय सुविधांसाठी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाला येणारे विनंतीअर्ज पाहिले, तर तिकडेही मदतीचा ओघ वाढवता येईल. शिक्षणासाठी गरीब विद्यार्थ्यांना मदत करता येईल. सरकारी प्राणीसंग्रहालयांच्या देणग्यांतही नियमित रक्कम पाठवता येईल. कुणाच्या जीवाशी खेळून कुणाचा जीव वाचवण्याला कुठे समर्थन मिळेल, असं वाटत नाही. आपल्या धार्मिक शिकवणीचा शिकवणुकीचा गाभा लक्षात घेऊन सगळ्यांनीच संयमाने वागावं, हे सर्वोत्तम!!

# कोकणचे सौंदर्य



कोकण म्हणजे उंच हिरवेगार डोंगर, नद्या-अथांग समुद्रकिनारा! कोकणच्या या सौंदर्यात आणखी भर घालतात ती पावसाळ्यात घाट रस्त्यातून जाताना दिसणारी हिरवाई. ती तर एक सुंदर स्वप्नच. सर्वत्र पसरलेली भातशेती कोकणच्या सौंदर्यात भर घालण्याचे काम करते. डोंगराच्या उतारावर टप्प्याने असणारी भातशेती कोकणात येणाऱ्या पर्यटकांच्या डोळ्यांचे पारणे फेडत असते. गढूळ पाण्याने दुथडी भरून वाहणाऱ्या नद्या आणि श्रावण महिन्यात या हिरवाईच्या पाश्वर्भूमीवर ऊन पावसाच्या खेळात सायंकाळच्या वेळी दिसणारे इंद्रधनुष्य म्हणजे कोकण असतं. कोकणची ही मस्त हिरवाई पर्यटकांचे मन मोहित करते. महाराष्ट्र राज्यातील कोकण विभागाचा विचार करता इतर विभागांच्या तुलनेने पावसाळ्यात कोकण विभागात सर्वात जास्त पाऊस पडतो. त्यामुळे निसर्गाचे खरे सौंदर्य हे पावसावर अवलंबून असते. कोकणामध्ये पावसाळ्यात जवळजवळ चार महिने अधूनमधून तुफान पाऊस होतो. याचा परिणाम नदीनाले व धरणे तुडुंब भरून वाहतात. यामुळे कोकणाचे हे नैसर्गिक सौंदर्य अधिक खुलून दिसते.यावर्षीही कोकणात राज्यातील अन्य भागांच्या तुलनेत पाऊस उत्तम झाला. शेती चांगलीच बहरली. पावसाने पेरणीपासून आता भात फुलोऱ्याला येईपर्यंत शेतकऱ्यांना चांगली साथ दिली. दरवर्षी वरुणराजा कोकणचं सौंदर्य अबाधित ठेवतो. पावसाळ्यात चारही महिन्यांत कोकणचा निसर्ग आपलं रूपडं पालटत असतो. कोकणचं खरं सौंदर्य बहरतं ते श्रावण आणि आश्विन महिन्यातच. श्रावणात कोकणची माळराने रानफुलांनी बहरतात. विविधरंगी रानफुले पाहताना रंगांनी भरलेला हा कोकण खूप सुंदर वाटतो. ऊन पावसाच्या खेळात ही रानफुले हिरव्या माळरानावर वाऱ्यासंगे डोलतात. निसर्गातील हे चमत्कार पाहायला मिळणं म्हणजे कोकणवासीयांसह पर्यटकांसाठी मोठी पर्वणीच. कोकणचं पर्यटन शांत, सुरक्षित आहे. नोव्हेंबर ते डिसेंबरपर्यंत कोकणात आल्यावर सुद्धा हिरवेगार कोकण पाहायला मिळते. त्यात भात शेती केल्याने अधिक कोकणचे सौंदर्य वाढण्याला मदत होते. कोकणी माणूस सुद्धा सणासुदीच्या दिवसांत न विसरता आपल्या गावी जाऊन येतात. जरी बंद घरे असली तरी अधूनमधून चाकरमानी आपल्या गावी आल्यावर आपल्या घराभोवती वाढलेले गवत कोयतीने कापल्यामुळे घर सुद्धा लांबून आकर्षक दिसू लागते.

राज्यातील कोकण विभागाचा विचार करता सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे, पालघर, मुंबई शहर व मुंबई उपनगर असे सात जिल्ह्े कोकण विभागात येतात. कोकण विभागाला जवळजवळ ७२० किलो मीटरचा निसर्गनिर्मित समुद्र किनारा लाभला आहे. कोकणातील जिल्हांवर समुद्र किनाऱ्याचा विचार करता रत्नागिरी जिल्हा (२३७ कि.मी.), रायगड जिल्हा (१२२ कि.मी.), सिंधुदुर्ग जिल्हा (१२० कि.मी.), ठाणे व पालघर जिल्हा (१२७ कि.मी.) आणि मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा (११४ कि.मी.) लाभला आहे. कोकण विभागातील सात जिल्ह्यांपैकी रत्नागिरी जिल्ह्याला २३७ किलो मीटर लांबीचा सर्वात जास्त समुद्र किनारा लाभलेला असून सर्वात कमी मुंबई शहर व मुंबई उपनगराला ११४ किलो मीटर लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे. आता कोकणात गेल्यावर सर्वत्र हिरवाईने सजलेले कोकण दिसेल. त्यासाठी कोकणात जावे लागेल. विशेष म्हणजे झाडे, वेली आणि गवत यामुळे कोकणातील टेकड्या अधिक हिरवळीने नटून दिसतात. हिरव्यागार गवतावरून फिरताना मजा काही औरच असते. अक्षरशः जिकडे तिकडे हिरवेगार पाहून मनाला खूप समाधान वाटते. डोंगराच्या कड्यावरून कोसळणारा व फेसळणारा धबधबा. घनदाट जंगलातून नागमोडी वळणाची पायवाट आणि पक्ष्यांचा किलबिलाट यामुळे वेगळाच आनंद मिळतो. यामुळे टेन्शन फ्री व्हायला होते. हीच खरी कोकणची ओळख आहे. त्याचमुळे १९९९ साली कोकणातील निसर्गरम्य सिंधुदुर्ग जिल्हा हा देशातील पहिला पर्यटन जिल्हा म्हणून भारत सरकारने घोषित केला. ही कोकण विभागाच्या दृष्टीने अभिमानाची बाब आहे.

कोकणच्या सौंदर्याचा विचार करता कोकणातील डोंगर व माळरान पाहिल्यावर जिकडे तिकडे हिरवेगार दिसते. त्यामुळे मनाला खूप समाधान वाटते. अशा या हिरव्यागार नैसर्गिक चाऱ्यावर चालताना तान भूक नाहीशी होते. जणू काय स्वर्गात आल्यासारखे वाटते. त्याचा आनंद काय वेगळाच असतो. विशेष म्हणजे, सुंदर दिसणाऱ्या चाऱ्यावरून फेरफटका मारताना टेन्शन सुद्धा निघून जाते. त्यामुळे पावसाळ्यात सुट्टीच्या दिवशी पर्यटक भटकंतीसाठी मोठ्या प्रमाणात कोकणात येत असतात. सध्या त्यांची संख्या सुद्धा वाढते आहे. याची अनेक कारणे आहेत; परंतु त्यापैकी एक कारण म्हणजे निसर्गाचा आनंद होय. पर्यटक कोकणात निसर्गाचा आनंद घेण्यासाठी येत असतात. कारण निसर्गाची खरी ओळख कोकणात आल्यावर पर्यटकांना कळते. त्यात नागमोड्या नद्यानाले डोंगराच्या पायथ्याशी व मळ्यातून वाहताना पाहून मनाला आनंद वेगळाच होत असतो. त्यात घनदाट झाडे. त्यातून वाहणारी गार गार हवा अंगाला गारवा देऊन जाते. गाडीतून जाताना नागमोडी वळणे असल्याने पाहायला खूप मजा वाटते. नाही म्हटले तरी ससा किंवा रान डुकराचे बऱ्याच वेळा अकस्मात दर्शन होते. तसेच विविध पक्षी सुद्धा पाहायला मिळतात. डोंगरात फिरताना हमखास मोराचे दर्शन होते. त्यात मजेशीर गंमत म्हणजे या झाडावरून त्या झाडावर उड्या मारताना माकडे पाहायला मिळतात. मी लहान असताना गुरांचा कळप सड्यावर चरताना पाहायला मिळत असे. आता तो पाहायला मिळत नाही. आता पाहायला दिसतात गवा रेड्यांचा कळप. तर शेतकऱ्यांच्या गोठ्यात दोन बैल किंवा गाय किंवा म्हशी पाहायला मिळतात. त्यामुळे बच्चे कंपनी अधिक खुशीत दिसतात. कारण गुराखी मुलांना गुरांजवळ घेऊन जातो. त्यांना हात लावतो. याची मजा जीवनात वेगळीच असते. तसेच माळरानावरील हिरव्यागार चाऱ्यावरून कुटुंबीयांसमवेत फिरताना पर्यटकांचे मन मोहीत करीत आहे. त्यामुळे बरेच पर्यटक सुट्ट्या घेऊन निसर्गाचा आनंद लुटण्यासाठी कोकणात येत असतात.

सध्या श्रावण महिना सुरू असल्याने माळरान रंगीबेरंगी फुलांनी उजळून निघाला आहे. माळावरील हरणाची फुले तर पर्यटकांना आकर्षित करताना दिसतात. काही परदेशी पर्यटक हरणाची फुले तोडून कानाला लावून आनंद व्यक्त करताना दिसतात, तर संध्याकाळच्या सुमारास इंद्रधनुष्याचे सुद्धा दर्शन होते. त्यामुळे आलेले पर्यटक अधिक उत्साही होताना दिसतात. हल्लीकडे तर कोकणातील जांभा दगड पर्यटकांचे मुख्य आकर्षण ठरत आहे. सर्रास कोकणात जांभ्या दगडांची घरे असून घराच्या आजूबाजूला नारळी-पोपळीच्या बागा आहेत. तेव्हा खळ्याच्या पेळयेवर बसल्यावर उन्ह असून सुद्धा झुळझुळणाऱ्या वाऱ्यामुळे मन कसे शांत होते. तेव्हा चला तर मग आता कोकणचे सौंदर्य पाहायला निसर्गरम्य कोकणात जाऊया.

# रायगड पालकमंत्र्यांची माळ



गेल्या आठ महिन्यांत रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी राष्ट्रवादीच्या मंत्री अदिती तटकरे होणार की शिवसेना शिंदे गटाचे मंत्री भरत गोगावले होणार याची अधून-मधून चर्चा सुरूच असते. कधी मंत्री भरत गोगावलेच पालकमंत्री होणार असा दावा करत राहिले, तर कधी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडूनही मंत्री अदिती तटकरे याच रायगडच्या पालकमंत्री होतील असे वारंवार म्हटले जात होते.नागपूर हिवाळी अधिवेशनात महाराष्ट्रात भारतीय जनता पार्टी, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट अशा महायुतीची सत्ता स्थापन झाली. महाराष्ट्रातील रायगड, नाशिक या दोन जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाची चर्चा आजही होतेच आहे. कोकणातील रायगड जिल्ह्यावर आजवर गेली अनेक वर्षे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचे नेहमीच प्राबल्य राहिले. रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री खासदार सुनील तटकरे आणि मंत्री अदिती तटकरे होता होता राहिले. गेल्या आठ महिन्यांत रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी राष्ट्रवादीच्या मंत्री अदिती तटकरे होणार की शिवसेना शिंदे गटाचे मंत्री भरत गोगावले होणार याची अधून-मधून चर्चा सुरूच असते. कधी मंत्री भरत गोगावलेच पालकमंत्री होणार असा दावा करत राहिले, तर कधी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडूनही मंत्री अदिती तटकरे याच रायगडच्या पालकमंत्री होतील असे वारंवार म्हटले जात होते. पालकमंत्र्यांकडे त्या-त्या जिल्ह्याच्या प्रशासनावर अंकुश ठेवता येतो. प्रशासनदेखील पालकमंत्र्यांच्या अधिकारावर काम करत राहते. त्यामुळेच पालकमंत्री आपल्याच पक्षाचा असला पाहिजे यासाठी दोन्ही बाजूकडून आग्रही भूमिका मांडली जाते. आता आणखी आठवड्याभरातच १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनाचा कार्यक्रम आहे. यामुळे साहजिकच रायगडच्या पालकमंत्री पदाचा विषय पुन्हा चर्चेत आला.

स्वातंत्र्यदिनाच्या ध्वजारोहणाचा मान कोणाला प्राप्त होणार, कोणाच्या हस्ते ध्वजारोहण होणार याची चर्चा होऊ लागली. यातच शिवसेना शिंदे गटांचे नेते राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी रोजगारहमी मंत्री भरत गोगावले पालकमंत्री होतील असे म्हटल्याने हा विषय पुन्हा एकदा राज्यामध्ये चर्चेत आला. रायगड जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी आणि शिवसेना शिंदेगट यांचे प्राबल्य आहे. यामुळे पालकमंत्रीपद कोणीही सहजा-सहजी सोडायला तयार नाही. राष्ट्रवादी आणि शिवसेना शिंदे गटाला रायगड जिल्ह्याच्या राजकारणावर आपल्या पक्षाचे वर्चस्व राहावं असे वाटत राहते. यामुळे तशा प्रकारचे प्रयत्न होत राहिले आहेत. १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने पालकमंत्रीपदाचा हा मुद्दा ऐरणीवर आला आहे. आजच्या महायुती आणि महाविकास आघाडीच्या राजकारणात कोणतेही मुद्दे कशाही पद्धतीने जरी ऐरणीवर आले तरीही युती आघाडीतील घटक पक्षांचे राजकारण हे नेहमीच समझोत्यांचे राहिले आहे. त्यामुळे रायगड आणि नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाबाबत जरी कितीही ताणा-ताणी होतेय असं वाटत असलं तरीही हा पालकमंत्रीपदाचा विषय समझोत्याने हाताळला जाईल यात कुणाला शंकाही वाटत नाही. याच कारण 'राजकारणामध्ये दिर्घकाळ कोणीही कोणाचा मित्र नसतो की कोणीही कोणाचा शत्रू नसतो' त्यामुळे जे काही होते ते समझोत्यानेच होत असतं आणि पुन्हा एकदा रायगड जिल्ह्याच्या राजकारणात समझोता एक्स्प्रेस धावताना दिसेल.

कोकणात गणेशोत्सव, शिमगोत्सव हे कोकणच्या जीवाभावाचे सण जवळ आले की, मग कोकणात येणाऱ्या-जाणाऱ्या मुंबईकर चाकरमान्यांच्या प्रवासाची चर्चा होते. त्याचवेळी मुंबई-गोवा महामार्गाचे काम कधी पूर्ण होणार याची चर्चा होते. यातच मग राज्याचे जे कोणी सार्वजनिक बांधकाम मंत्री असतील त्यांचे गणेशोत्सवाच्या पूर्वी चार-सहा कोकण दौरे मुंबई-गोवा महामार्गाची पाहणी या वर्षअखेरीस महामार्ग पूर्ण होण्याचे नवे आश्वासन दिले जाते. हा महामार्ग कधी पूर्ण होईल हे फक्त साक्षात त्या परमेश्वरालाच माहीत; परंतु कधी-कधी एक दरवाजा बंद झाला असं आपणाला वाटते तेव्हा दोन-दोन पर्याय त्यासाठी निर्माण होतात असच काहीसं कोकणातील मुंबईकर चाकरमानी प्रवाशांसाठी म्हणता येऊ शकेल. कोकण रेल्वे मार्गावर प्रथमच कोकण रेल्वेने रो-रो कार सेवा सुरू करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. कोकण रेल्वेच्या या रो-रो कार सेवेत या पहिल्याचवेळी सर्वकाही आलबेल असेल असं निश्चितच होणार नाही; परंतु जर कोकण रेल्वेचा रो-रो कार सेवेचा प्रयोग यशस्वी झाला, तर निश्चितच भविष्यातही त्याचा विचार होऊ शकेल.

कोकण रेल्वेच्या रो-रो कार सेवेला कोलाड ते नांदगाव आणि वेर्णा अशी ही रो-रो सेवा कोकण रेल्वे देणार आहे. सिंधुदुर्गातील नांदगाव रेल्वे स्टेशनला या रो-रो कार सेवेचा थांबा देण्यात आला आहे. कोकण रेल्वे मार्गाची जेव्हा आखणी करण्यात आली तेव्हा कणकवली तालुक्यातील नांदगाव रेल्वे स्टेशन हे जंक्शन रेल्वे स्टेशन म्हणून संबोधले गेले आहे. याच नांदगाव रेल्वे स्टेशनवरून नियोजित पश्चिम महाराष्ट्राला जोडणारा रेल्वे मार्गाचे सर्व्हेक्षण करण्यात आले होते. त्यामुळे कोकण रेल्वेच्या नकाशावर नांदगाव जंक्शन म्हणून रेकॉर्डवर असलेले रेल्वे स्टेशन केवळ नांदगाव रोड रेल्वे स्टेशन म्हणून प्रवाशांच्या रेल्वे प्रवासात माहितीचे झाले होते. याचं कारण फक्त एक-दोन रेल्वे गाड्यांनाच नांदगाव रेल्वे स्टेशनचे थांबे आहेत. अन्यथ: कोकण रेल्वे मार्गावरच्या प्रवासात रेल्वे क्रॉसिंगसाठी या नांदगाव रेल्वे स्टेशनरोडवरील रेल्वे ट्रॅकचा वापर होतो. खरं तर रेल्वे 'क्रॉसिंग' पॉईंट म्हणायला काहीच हरकत नाही; परंतु कधी-कधी चांगल्या कामाचीही वेळ यावी लागते. ती कोकण रेल्वे रो-रो कारसेवेच्या निमित्ताने प्रगतीची वेळ आली आहे. असं म्हटल तर निश्चितच गैर ठरणार नाही. नांदगाव रेल्वे स्टेशनच्या बाजूलाच सिंधुदुर्ग कृषी बाजार समितीच मार्केट यार्ड उभं राहतय. त्यामुळे भविष्यात निश्चितच कोकणातील नांदगाव जंक्शन रेल्वे स्टेशन कोकण रेल्वे मार्गावरील अतिशय महत्त्वाचे रेल्वे स्टेशन होईल यात शंका नाही. कोकण रेल्वेने रो-रो कारसेवेच सुतोवाच केलं तेव्हा ही रेल्वे रो-रो कारसेवा थेट वेर्णा-गोवा येथेच थांबणार होती; परंतु जेव्हा कोकणातील खासदार नारायण राणे आणि सिंधुदुर्गचे पालकमंत्री नितेश राणे यांनी भारताचे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याशी चर्चा करून कोकणाला रो-रो रेल्वे कार सेवेचा काहीच उपयोग होणार नाही हे जेव्हा निदर्शनास आणून दिले तेव्हा कोकणातील नांदगाव रेल्वे स्टेशनला रेल्वे रो-रो कार सेवेला थांबा देण्यात आला आहे. या रो-रो रेल्वे कार सेवेला मुंबईकर कोकणवासीय कशापद्धतीने प्रतिसाद देतात त्यावरच या रो-रो कार सेवेच भवितव्य ठरणार आहे.

# आ.राजेश पवार यांच्या जनता दरबारात तक्रारींचा पाऊस : जनता दरबार चालला तब्बल सात तास

## गोरगरीबांकडून चिरीमिरी घेतली, तर गाठ माझ्याशी–आ राजेश पवार यांचा इशारा

**नायगाव । हनुमंत चंदनकर**

नायगाव विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार तथा कार्यसम्राट आ. राजेश पवार यांनी नुकतेच पावसाळी अधिवेशन संपल्यानंतर नायगाव तालुक्यातील नागरिकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी शुक्रवारी नायगाव तहसील कार्यालयातील नुतन सभागृहात 'जनता दरबारा'चे आयोजन केले होते.या जनता दरबारात पादन रस्ते, जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा तसेच घरकुल लाभार्थ्यांच्या समस्या आदी अनेक तक्रारी मांडण्यात आल्या. स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावून विविध प्रश्न उपस्थित केल्याने दरबारात तक्रारींचा अक्षरशः पाऊस पडला. तक्रार ऐकताच आ. पवार यांनी संबंधित अधिकारी कर्मचा–यांना एका एकांना समोर बोलवून थेट जनतेसमोरच जाब विचारला आणि तातडीने कारवाईचे निर्देश दिले. यावेळी आ. राजेश पवार यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला की, गोरगरीबांकडून चिरीमिरी घेण्याचा प्रयत्न केल्यास गाठ माझ्याशी आहे हे लक्षात ठेवा

या जनता दरबारात प्रशासन आणि जनतेमध्ये थेट संवाद घडून आल्यामुळे अनेकांचे प्रश्न मार्गी लागले असून नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक केले आहे.मध्ये काही महिने जनता दरबार झाले नाही त्यामुळे तालुक्यातील शेकडो नागरीकांच्या तक्रारी होत्या.

शुक्रवारी झालेल्या जनता दरबारात तालुक्यातून शेकडो महीला,पुरुष,वयोवृद्ध आपल्या तक्रारी घेऊन आले होते.आ.राजेश पवार यांनी एका एकाना जागेवर उभे करून त्यांची तक्रार ऐकून घेण्यासाठी त्याच्या हातात माईक देऊन तक्रार ऐकुन घेतले व तक्रारीचे निवारण करण्यासाठी संबंधित आधिकारी किवा कर्मचा–यांना जागेवर उभे करून उत्तर देण्यास भाग पाडले. विशेष म्हणजे सर्वात जास्त तक्रारी घरकुल धारकांनी घेऊन आले होते. या संबंधित जेवढे काही अधिकारी येतात त्यांना समोर बोलवून एका एकाची हजेरी घेऊन या



पुढे एकाही घरकुल धारकांची तक्रार येऊ देणार नाही अशी शपथ संबंधित कर्मचा–यांकडुन घेण्यात आली. यावेळी जि.प.च्या माजी सदस्या पुनमताई पवार , बिलोलीच्या उपविभागीय अधिकारी क्रांती डोम्बे, तहसीलदार धमप्रिया गायकवाड, गटविकास अधिकारी वानखेडे ,सा.बां.चे उपअभियंता बारसकर ,पाणी पुरवठा विभागाचे उप अभियंता सरनाईक,उप अभियंता होनराव, सी.डी.पी.ओ. वनशेट्टे , जे.ई. गोणेवार,मयुर जिरवणकर,नाईकवाडे, धाबे, ए.पी.ओ.कदम ,जेई पाटील, पोलीस निरीक्षक मारकड ,स.पो.नि.भोसले , स.पो.नि.विक्रम हराळे यांच्यासह भाजपचे तालुकाध्यक्ष बालाजी मदेवाड, श्रीहरी देशमुख, हबर्डे, भाजप शहराध्यक्ष माधव पा.कल्याण,सरपंच प्रमेश्वर पा. सोमठाणकर, गंगाधर पा., उपसरपंच व्यंकटराव पा.राहेरकर,सरपंच प्रा. मनोहर तोटरे, सुनिल लुगारे,सरपंच रंजित कुरे, प्रकाश पा.हेन्डगे,दत्ता पा.ढगे,धनजय पा.जाधव,फत्ते, राहुल पा.शिंदे, उपसरपंच नागेश पा.काहाळेकर,सोपान कदम, संजु पा.चोंडे,आवकाश पा.धुप्पेकर,राजेंद्र पा. कुंचेलीकर यांच्यासह विभागाचे अधिकारी कर्मचारी सरपंच उपसरपंच सदस्य नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## केज पंचायत समितीच्या तटभिंतीवर अनाधिकृत जाहिरात देण्यासाठी संपर्क साधा

**केज । प्रतिनिधी**

केज पंचायत समिती या ना त्या कारणाने दिवसेंदिवस चर्चेत असते. पंचायत समितीमधील भ्रष्टाचार असो किंवा शेतकऱ्यांची पिळवणूक, हे विषय नेहमीच चर्चेत राहतात. मात्र यावेळी पंचायत समिती एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आली आहे.

चक्क नव्याने उभा केलेल्या तटभिंतीवर १०४० आकाराचे दोन होर्डिंग कोणतीही शासकीय परवानगी न घेता, केज येथील काही बॅनर व्यवसाय करणाऱ्या दुकानदारांनी भिंतीला खिळे ठोकून तसेच वेल्डिंग करून कायमस्वरूपी बसवले आहेत.



यावर केजच्या गटविकास अधिकारी समृद्धी दिवाणे यांच्या नजरेस ही अनाधिकृत होर्डिंग्ज गेल्यानंतरही कारवाई होत नसल्याची चर्चा आहे. काहींच्या मते, ओळखीपाळखीमुळे कारवाई टाळली जात असावी. परिणामी, हे महाकाय बॅनर पाहणाऱ्या नागरिकांमध्ये दुकानदार व अधिकारी यांच्यात टक्केवारीचे व्यवहार सुरू असल्याचा संशय व्यक्त होत आहे.

अशा प्रकारे कारवाई न झाल्याने, पंचायत समितीच्या तटभिंतीवर ठोकलेल्या १०४० आकाराच्या दोन हॉर्डिंगवर अनाधिकृत जाहिरात देण्यासाठी संपर्क साधा, असेच म्हणण्याची वेळ आल्याची कुजबुज सुरू आहे.

## जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांचा अभिनव 'पायी पायी पाढे' उपक्रम

**मोलगी । रविंद्र वळवी**

दुर्गम भागात शिक्षणाची गंगा

दुर्गम आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शिक्षकांचे नवनवीन प्रयोग सुरू आहेत. धडगाव तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, काल्लेखेतपाडा येथे 'पायी पायी पाढे' हा उपक्रम राबवण्यात आला आहे.



या शाळेतील सुमारे २६० विद्यार्थी दररोज ३ ते ४ किलोमीटर पायी चालत शाळेत येतात. या प्रवासाचा वेळ शैक्षणिकदृष्ट्या उपयुक्त बनवण्यासाठी शिक्षकांनी हा उपक्रम सुरू केला. यामध्ये, १ ते ३० पर्यंतचे पाढे पाठ करणे, आकडेमोड कौशल्ये वाढवणे, मोठ्या मुलांकडून लहान मुलांनी शिकणे, असे अनेक उद्देश साध्य केले जात आहेत.

विद्यार्थ्यांच्या प्रवास मार्गाप्रमाणे गट तयार करण्यात आले आहेत. प्रत्येक गटात एक 'पाढा नेता' आहे. शाळेत येताना हे गट तालासुरात पाढे म्हणतात. कधी गाणी, कधी प्रश्नोत्तरे अशा विविध पद्धतींनी पाढ्यांचा सराव केला जातो. यामुळे विद्यार्थ्यांची गणित विषयातील गती व अचूकता वाढली आहे. तसेच, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आहे.जिल्हा परिषद नंदुरबार चे मुख्य कार्यकारी अधिकारी सावनकुमार, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भानुदास रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली, गटशिक्षणाधिकारी डी.डी.राजपूत यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम यशस्वीपणे राबवण्यात आला आहे. 'पायी पायी पाढे' हा उपक्रम शिक्षण आणि दैनंदिन जीवन यांची सांगड घालणारा प्रभावी प्रयोग आहे. हा उपक्रम दुर्गम भागातील इतर शाळांसाठी प्रेरणादायी ठरू शकतो

## अक्कलकुवा आदिवासी गौरव दिवस साजरा

# अक्कलकुवा शहरातून काढण्यात आली भव्य सांस्कृतिक रॅली

**मोलगी । रविंद्र वळवी**

आदिवासी गौरव दिनानिमित्त अक्कलकुवा येथील महाकाली माता मंदिराच्या सभा मंडपात दोन दिवसीय विविध कार्यक्रम मोठया उत्साहात संपन्न झाले.

सदर कार्यक्रम हे अक्कलकुवा,अक्राणी विधानसभा मतदारसंघाचे आमदार आमश्या पाडवी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. अक्कलकुवा तालुक्यात आमदार आमश्या पाडवी यांच्या नेतृत्वाखाली सन २००३ पासून आदिवासी गौरव दिवस साजरा करण्यात येतो. सकाळी अक्कलकुवा येथील विर एकलव्यच्या पुतळ्याचे विधिवत पारंपारिक पुजन करुन पुष्पहार अर्पण करण्यात आला त्यानंतर महाकाली माता मंदिराच्या सभा मंडपात आदिवासी बांधवांचे कुलदैवत याहामोगी मातेचे पारंपारिक पद्धतीने अन्नधान्यचे पुजन करण्यात आले. त्यानंतर सभा संपन्न झाली. कार्यक्रमात उपस्थित असलेल्या प्रमुख पाहुण्यांनी उपस्थित जनसागराला मार्गदर्शन केले. यावेळी आमदार आमश्या पाडवी यांनी आदिवासी बांधव हा निसर्ग पुजक असुन आपण जल, जमीन, जंगलचे संवर्धन केले पाहिजे असे सांगत आदिवासी



कलाकारांना प्रोत्साहन मिळावे यासाठी आदिवासी विश्व दिनानिमित्त आदिवासी कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करुन देऊन त्यांना आपल्यातील कलागुणांना प्रदर्शित करण्याची संधी उपलब्ध करुन देणे हे आपले कर्तव्य असल्याचे सांगितले. याप्रसंगी जी. डी. पाडवी, वसंत वसावे, पृथ्वीसिंग पाडवी, माजी समाज कल्याण माजी शंकर पाडवी, अँड. एल. एम. पाडवी, कान्हा नाईक, किसन महाराज, कथ्थु सैंदाणे, रविंद्र पाडवी, विश्वास मराठे, रविंद्र चौधरी, कपिलदेव चौधरी, डिम्पल चौधरी, विनोद वळवी, राजेंद्र वसावे, जेका पाडवी, तुकाराम वळवी, आनंद वसावे, जवराबाई पाडवी, दुर्गाताई पाडवी, कांचन पाडवी, ललिता वळवी, अंजुताई पाडवी, सुनिता पाडवी, निता माळी, संध्या पाटील, भावेश पाडवी, तसेच आदिवासी कलाकार व शालेय विद्यार्थी व आदिवासी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभेनंतर अक्कलकुवा शहरातून पारंपारिक ढोलवाद्य, तुरवाद्य, पावा, बासरीच्या ठेक्यावर सवाद्य सांस्कृतिक रॅली काढण्यात आली. या रॅलीत आदिवासी बांधवआप आपली पेहराव करुन मोठ्या जल्लोषात सामील झाले. रॅलीत सोंगाड्या पथकाने आपली संस्कृती जीवंत ठेवली.

## चक्क पाझर तलावात खदाण आणि खडीक्रेशर !

# तालुक्यातील केकत सारणी शिवारात पाझर तलावातून बेसुमार अवैध गौणखनिज उपसा

### तक्रारदार रमाकांत धायगुडे यांच्या तक्रारीनंतर घटनास्थळी पंचनाम्यात मुरूमाचे ढिग आढळून आले, आता प्रशासन कारवाई काय करणार ?

**केज । प्रतिनिधी**

पाझर तलावातून अवैध गौणखनिज उपसा करून चक्क त्या तलावाला खदाणीचे स्वरूप आले आहे. तसेच तलाव परिसरातच एकाने खडीक्रेशर सुरू केल्याने या खडीक्रेशरला परवानगी कोणी दिली? असे अनेक प्रश्न उपस्थित झाले असून केज तालुक्यातील केकतसारणी शिवारात तलावातून अवैध गौणखनिज बेसुमार उपसा झाल्याचे दिसून येत आहे.



या प्रकरणी समाजसेवक रमाकांत धायगुडे यांनी तक्रार देवून याप्रकरणी कारवाईची मागणी केल्यानंतर त्याठिकाणी संबंधित मंडळाधिकारी यांनी पंचनामा केला असता अनेक गंभीर बाबी समोर आल्या असून आता केज प्रशासन या प्रकरणी काय कारवाई करणार याकडे लक्ष लागून आहे.विशेष म्हणजे तलावात खदाण असल्याचे दिसून आले.त्याशिवाय एक खडीक्रे शरही त्याठिकाणी सुरू असल्याचे पंचनाम्यातून समजून आले.विशेष म्हणजे ज्याठिकाणी हे तलाव आहे आणि खडीक्रेशर सुरू आहे त्या जमिनीच्या सातबारावर महाराष्ट्र शासन नाव असल्याने सदरील खदाण आणि खडीक्रेशर महाराष्ट्र शासनाच्या जागेवर सुरू असल्याचे स्पष्ट दिसून येत असून तलावात अक्षरशः ४० ते ५० फुटाचे खड्डे अवैध गौणखनिज उपसा करून झाल्याचे दिसून आले आहे. विशेष म्हणजे तलावात मुरूमाचे ढिगही आढळून आले असून एकंदरीत त्या पाझर तलावातून बेसुमार उपसा झाल्याचे दिसून येत असून प्रशासनाने संबंधितांवर गंभीर कारवाई – करण्याची गरज आहे.

**ग्रामस्थ आणि पाळीवप्राण्यांचे जीव धोक्यात !**

पाझर तलावातून गौणखनिज उपसा करायचा असेल तर संबंधित विभागातून परवानगी घेणे गरजेजे आहे.तसेच राज्यमहामार्गाचे काम असेल तरच संबंधित विभाग तलावातून गौणखनिज उपसा करण्याची परवानगी देते. परंतु संबंधितांनी कोणतीही परवानगी नसताना तलावातून बेसुमार गौणखनिज अवैध उपसा केला. त्यातून तलावात ४० ते ५० फुटाचे खड्डे झाले.या खड्ड्यांमुळे पाणी पिण्यासाठी येणाऱ्या पाळीवप्राण्यांचे व इतर प्राण्यांचे जीव धोक्यात आले असून यातून ग्रामस्थांचीही मोठी जीवित हानी होवू शकते.यासाठी प्रशासनाने अवैध मुरूम उपसा करणाऱ्या व खडीक्रेशरखवाल्यावर गंभीर कारवाई करण्याची गरज असून विशेष म्हणजे मंडळाधिकारी यांनी याप्रकरणी स्पष्ट पंचनामा करून सर्व बाबी नमुद केलेल्या आहेत. त्या दृष्टीकोनातून प्रशासन याप्रकरणी काय कारवाई करणार याकडे विशेष लक्ष राहणार आहे.

# डिजिटल मिडिया परिषदेचे पहिले राज्यव्यापी अधिवेशन १४ सप्टेंबर रोजी संभाजीनगर येथे होणार–एस.एम.देशमुख

**मुंबई । प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचा उपक्रम असलेल्या डिजिटल मिडिया परिषदे चे पहिले राज्यव्यापी अधिवेशन १४ सप्टेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होणार असल्याची माहिती एस.एम.देशमुख यांनी दिली आहे..

डिजिटल मिडियात काम करणारया पत्रकारांसाठी अ. भा. मराठी पत्रकार परिषदेने डिजिटल मिडिया परिषद या नावाचा स्वतंत्र विभाग सुरू केला आहे.. राज्यातील ३० जिल्ह्यात आता डिजिटल मिडियाच्या शाखा सुरू झाल्या असून या माध्यमातील २००० पत्रकार परिषदेशी जोडले गेलेले आहेत.. उर्वरित जिल्ह्यात शाखा स्थापन करण्याची प्रकिया सुरू आहे..

परिषदेशी जोडल्या गेलेल्या या पत्रकारांना एकत्र करून डिजिटल माध्यमांची तांत्रिक माहिती देणे, तसेच परस्पर सुसंवाद, येणारया अडचणी यांची चर्चा करणे हा या अधिवेशनाचा उद्देश आहे..

१४ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता एकनाथ रंगमंदिर क्रांती चौक येथे मान्यवरांच्या हस्ते अधिवेशनाचे उद्घाटन होईल.. डिजिटल मिडिया विश्वातील मान्यवरांची व्याख्यानं होतील.. तसेच उत्कृष्ट युट्यूब आणि पोर्टल चालविणारया दहा संपादकांचा अधिवेशनात सन्मान करण्यात येणार आहे.. सबस्क्राईबर्स, व्ह्यूवर्सची संख्या, तांत्रिक बाजू, बातम्यांची निवड आणि लोकांचे प्रश्न उत्तम पध्दतीनं मांडणारया संपादकांची निवड करून त्यांचा गौरव केला जाईल..

डिजिटल मिडिया परिषदेची अद्याप राज्य कार्यकारिणी झालेली नाही.. अधिवेशनात राज्य कार्यकारिणी निवडली जाणार आहे..

डिजिटल मिडियाला सरकारने जाहिराती देण्याचा निर्णय घेतला असला तरी या जीआर मध्ये युट्यूब चँनल्स तसेच न्यूज पोर्टलचा उल्लेख नाही... ही बाब मुख्यमंत्र्यांच्या नजरेस आणून देत त्यांना जाहिराती मिळाव्यात असा प्रयत्न केला जाणार असल्याचे तसेच डिजिटल पत्रकारांना अधिस्वीकृती मिळावी यासाठी देखील सरकारकडे पाठपुरावा केला जाणार असून अधिवेशनात तसे ठराव मांडले जाणार आहेत..

प्रिन्ट आणि इलेक्ट्रॉनिक मिडियाचे अनेक प्रश्न अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेने मार्गी लावले आहेत.. त्याच प्रमाणे डिजिटल मिडियाला भेडसावणारे प्रश्न हाती घेऊन डिजिटल मिडिया परिषद त्यांचा पाठपुरावा करणार आहे अधिवेशनात त्यासंबंधी देखील चर्चा आणि विचारविनिमय होणार आहे..डिजिटल मिडियाच्या या पहिल्या अधिवेशनास डिजिटल माध्यमातील पत्रकारांनी मोठ्या संख्येनं उपस्थित राहावं असं आवाहन परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख डिजिटल मिडिया परिषदेचे अध्यक्ष अनिल वाघमारे, विभागीय सचिव रवी उबाळे, कार्यक्रमाचे निमंत्रक आणि संभाजीनगर जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष बालाजी सूर्यवंशी यांनी केले आहे...



# गुटखा प्रकरणातील दोन आरोपींना न्यायालयीन कोठडी

**केज । गौतम बचुटे**

केज पोलिसांनी कळंबकडे गुटखा घेऊन निघालेला ट्रक फिल्मी स्टाईलने पाठलाग करून ताब्यात घेतला होता. त्या ट्रकमध्ये १ कोटी १ लाख ५२ हजार रु. किंमतीचा होता. त्यातील दोन आरोपींना न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या दौऱ्याच्या दिवशीच दि. ७ ऑगस्ट रोजी मध्यप्रदेशातून केज मार्गे कळंब जि. धाराशिवकडे गुटखा घेऊन एक ट्रक केजच्या दिशेने येत असल्याची माहिती केज पोलिसांना मिळाली होती. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी त्यांच्या पथकाला ट्रक क्र. (डी डी-०२/एस-९४४२) ताब्यात घेण्यासाठी कारवाई करण्याचे आदेश दिले. पोलिसांनी तो ट्रक ताब्यात घेण्यासाठी सापळा लावला. सदर ट्रक छत्रपती शिवाजी महाराज चौकातून भरधाव वेगात कळंबच्या दिशेने वळविण्यात आला. सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप मांजरमे, पोलिस उपनिरीक्षक उमेश निकम, पोलिस कॉन्स्टेबल शिवाजी कागदे, हेडकॉन्स्टेबल त्रिंबक सोपने, पोलिस कॉन्स्टेबल हनुमान मुंडे, पोलिस कॉन्स्टेबल शमीम पाशा, वाहन चालक सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक शंभुदेव दराडे यांनी पाठलाग करून केज पासून दीड कि. मी. अंतरावर या भरधाव वेगातील ट्रकला पोलिसांनी ओव्हरटेक करून कळंब रोडवर असलेल्या कमल पेट्रोलियम पेट्रोल पंपा जवळ पोलिस गाडी आडवी लावून ट्रक थांबवला होता. पोलिसांनी इशारा करून ट्रक थांबताच ट्रक ड्रायव्हर शेजारी बसलेला एक इसम परशुराम मोहन गायकवाड, हा ट्रक मधून उडी मारून एका शेतात पळून गेले. त्यांच्या मागे चिखल तुडवत आणि काट्या-कुट्यातून पोलिस फिल्मी स्टाईलने पाठलाग करीत असताना त्यांनी गुंगारा देऊन उसाच्या शेतात जाऊन लपून बसला होता. त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने अशी माहिती दिली की, जालीमसिंग (रा. बुऱ्हाणपूर, ता. जि. बुरहानपूर, मध्यप्रदेश) याने हा गुटखा इंदौर येथुन ट्रक मध्ये भरुन दिला. तो गुटखा धाराशिव जिल्ह्यातील कळंब येथील व्यापारी रुपेश मालपाणी रा. कळंब जि धाराशिव यांना पोहोच



करायचा होता. अशी माहिती त्यांनी दिली.
केज पोलिसांनी रईसोयीन अमीरोद्दीन शेख, वय (५९ वर्षे), (रा. मील्लतनगर, ओकाला रोड, ता. जि. रतलाम, मध्यप्रदेश), परशुराम मोहन गायकवाड, वय (२२ वर्षे), (रा. एकनाथवाडी, ता. पाथर्डी, जि अहिल्यानगर ह. मु. बीड) आणि गुटख्यासह ट्रक ताब्यात घेतला होता. पोलिसांनी ऊसात लपलेला ताब्यात घेतलेला परशुराम गायकवाड हा सराईत वाँटेड गुन्हेगार असून त्याच्यावर पुणे, अहिल्यानगर, संभाजीनगर, धाराशिव, बुलढाणा, नाशिक आणि बीड या सात जिल्ह्यात सशस्त्र दरोडा, वाटमारी, चोरी, दुखापत करणे, गुटखा वाहतूक करणे. असे सतरा गुन्हे दाखल आहेत. केज पोलीस ठाण्यात रईसोयीन अमीरोद्दीन शेख, वय (५९ वर्षे), (रा. मील्लतनगर, ओकाला रोड, ता. जि. रतलाम, मध्यप्रदेश), परशुराम मोहन गायकवाड, वय (२२ वर्षे), (रा. एकनाथ वाडी, ता. पाथर्डी, जि अहिल्यानगर ह. मु. बीड), जालीमसिंग, रा. बुऱ्हाणपूर जि. इंदौर, मध्यप्रदेश), रुपेश मालपाणी, जालीमसिंग, रा. बेहरामपुर, ता. जि. बुरहानपूर, मध्यप्रदेश) आणि रुपेश मालपाणी (रा. कळंब जि. धाराशिव) या चौघांच्या विरुद्ध गु. र. नं. ४३०/२०२५ भा. न्या. सं. १२३, २३३, २७४, २७५ या सह २६(२) (ळीं), २७(३)(डी), ३०(२), ५९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुटखा प्रकरणातील पोलिसांच्या ताब्यात असलेले रईसोयीन अमीरोद्दीन शेख.आणि परशुराम मोहन गायकवाड या दोघांना न्यायालयाने दि.११ ऑगस्ट पर्यंत पोलिस कोठडी सुनावली होती. दि. ११ ऑगस्ट रोजी त्यांना न्यायालया समोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना आता न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप मांजरमे हे तपास करीत आहेत.

# अंगणवाडी सेविकेची मुलगी झाली पोलीस : आई वडिलांचे स्वप्न झाले साकार

## हातातला कोयता खाली टाकून आता हाती आली लाठी

## खा.बजरंग सोनवणे यांनी केले काजलचा सत्कार!

**केज । गौतम बचुटे**



आई अंगणवाडीत खाऊ शिजविण्याचे काम करीत असून वडील एक ऊसतोड कामगार असताना काजल शिनगारे हिने आपल्या प्रयत्न आणि बुद्धीच्या जोरावर मुंबई पोलिसात भरती होऊन आपल्या आई वडिलांचे स्वप्न साकार केले आहे. केज तालुक्यातील कोरेगाव येथील काजल शिनगारे ही एका सामान्य कुटुंबातील मुलगी आहे. घरात शिक्षणाचा कोणताही वारसा नाही. तिची आई उर्मिला पायाळ-शिनगारे ही अंगणवाडीतील मुलांना खाऊ शिजवून वाटपाचे काम करीत आहे. तर वडील हे ऊसतोड आणि रोजी रोजंदारी करीत आहेत. काजल हिनेही आई वडिलांना मदत करण्यासाठी शाळेत असताना आई वडिलांच्या सोबत ऊस तोडण्याचे काम केले आहे. तसेच तिने लोकांच्या शेतात ट्रॅक्टरने नांगरणी देखील केल्याचे काम केले आहे. घरातील गरिबी आणि कसलेही शैक्षणिक वातावरण नसताना तिने कराटेचे देखील कला आत्मसात केली आहे.
तिचे अनेक दिवसा पासून पोलिसात भरती होण्याचे स्वप्न होते. अगदी भल्या पहाटे उठून ती धावणे आणि व्यायाम करून पोलिस भरतीचा सराव करीत असे. मागे दोन वेळेस तिची पोलिस भरतीत अगदी थोड्या गुणांनी तिची संधी हुकली होती. पण मी एक दिवस पोलिसात भरती होऊन आई वडिलांचे स्वप्न साकार करीन अशी तिने मनाशी खुणगाठ बांधली होती. त्यामुळे तिने पुन्हा नव्याने तयारी सुरू करून मुंबई पोलिस दलात भरती झाली आहे आणि आई वडील यांचे स्वप्न साकार केले आहे. तिने मिळविलेल्या या यशा बद्दल सर्वत्र कौतुक आणि अभिनंदन होत आहे. काजल शिनगारे ही मुंबई पोलिस दलात भरती झाल्याची माहिती मिळताच खा. बजरंग सोनवणे यांनी काजल शिनगारे हिचा सत्कार केला. यावेळी सरपंच तांदळे, तिची आई उर्मिला, वडील लक्ष्मण शिनगारे यांच्यासह अनेकांनी तिचे अभिनंदन केले आहे.

> **डोळ्या समोर ध्येय कायम ठेवून सराव आणि अभ्यासात सातत्य ठेवणे आवश्यक असुन अपयशाने न खचता तयारी केल्यास यश मिळते.**
> **-काजल शिनगारे**

# रक्षाबंधनाच्या दिवशी ठाण्यात ९ लाख ६३ हजार किंमतीचे दागिने लंपास

**ठाणे । प्रतिनिधी**



रक्षाबंधनाच्या पवित्र सणाच्या दिवशी ठाण्याच्या टेंभी नाका भागात एक खळबळजनक चोरी घडली. ठाण्यातील एक घर रक्षाबंधनाच्या दिवशी चोरट्यांच्या निशाण्यावर आले आणि लाखो रुपये किमतीचे सोनं, चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरीला गेले. ही घटना ठाण्याच्या कापडी चाळ परिसरातील एका घरात घडली, जिथे सुदेश चंद्रकांत कापडी आपल्या कुटुंबासह घराच्या बाहेर होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या लाडक्या बहिणीच्या घरी चोरांनी धाड टाकली आणि मालमत्ता लंपास केली. ९ ऑगस्ट शनिवार रोजी सुदेश कापडी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी रक्षाबंधनाच्या निमित्ताने नातेवाईकांकडे गेले असता १० ऑगस्ट रात्री ०९:३० वा. परत आल्यानंतर घराचे हॉल आणि बेडरूम अस्तव्यस्त दिसले. घराच्या लोखंडी सेफ्टी डोअरचा कोयंडा तुटलेला होता आणि कपाटे उघडी होती. घरातील लॉकर उघडून पाहिलं, तर ते पूर्णपणे मोकळं होतं. त्याचवेळी, देवघरात चांदीच्या देवांच्या मुर्त्या जमिनीवर पडलेल्या आढळल्या. यावरून त्यांना खात्री झाली की अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश करून महत्त्वाचे दागिने व रोख रक्कम चोरून नेली आहे.त्यांच्या अनुपस्थितीत चोरट्यांनी संधी साधली आणि घरात घुसून पैशांची चोरी केली.
सुदेश कापडी यांच्या घरातील दागिने आणि वस्तू मिळून एकूण ९,६३,६०० ऐवज चोरीला गेला आहे. सुदेश कापडी यांनी नौपाडा पोलिसांत तक्रार दाखल केली असून पोलिसांनी चोरांना तातडीने पकडावे अशी मागणी ठाणेकरांकडून होत आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, चोरांनी घराचे दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि चोरी केली. चोरांचा मागोवा घेण्यासाठी स्थानिक पोलिसांकडून विशेष तपास सुरू आहे. काहींनी यावर सवाल उपस्थित केला आहे की शिंदे साहेबांच्या लाडक्या बहिणीला न्याय मिळेल का? राजकारणाच्या वर्तमनातील स्थिती आणि पोलिसांच्या कार्यक्षमतेवर अनेकांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, ठाणेकर नागरिक आणि नेत्यांमध्ये या घटनेवर अनेक प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

# जागतिक आदिवासी दिनी विद्यार्थिनींचा पारंपारिक पोशाखात सांस्कृतिक उत्सव



**धुळे । प्रतिनिधी**

घोटी (ता. इगतपुरी, जि. नाशिक) येथीलसरस्वती प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यालयातील विद्यार्थिनींनी पारंपारिक आदिवासी पोशाख परिधान करून सांस्कृतिक परंपरेचे सुंदर दर्शन घडविले.
कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयाच्या प्रांगणात आदिवासी समाजातील पूज्य व्यक्तींच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण व पूजन करून झाली. यानंतर विद्यार्थिनींनी गाणी, नृत्य आणि पारंपारिक सादरीकरणांच्या माध्यमातून आदिवासी संस्कृतीची समृद्ध परंपरा जिवंत केली.
शिक्षकांनी या प्रसंगी आदिवासी समाजाचा इतिहास, संस्कृती आणि त्यांच्या योगदानाबाबत माहितीपूर्ण भाषणे केली.आदिवासी परंपरा ही आपल्या सांस्कृतिक वारशाचा महत्त्वाचा घटक आहे; या दिवसाचे औचित्य साधून त्याबद्दल अभिमान बाळगणे गरजेचे आहे,असे मत शिक्षकांनी व्यक्त केले.
या कार्यक्रमाला मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, पालक, तसेच स्थानिक मान्यवरांची उपस्थिती लाभली. विद्यार्थिनींच्या सहभागामुळे विद्यालय परिसरात उत्साहपूर्ण आणि सांस्कृतिक वातावरण निर्माण झाले.

# दिल्लीतील निवडणूक आयोगाविरोधातील मोर्चात बीडचे खा.सोनवणे आघाडीवर

## महाराष्ट्रात मतदानाच्या आदल्यादिवशी मतदार यादीत नावे सामाविष्ठ केली: खा.सोनवणे

**बीड । प्रतिनिधी**




> **लोकशाही टिकवण्यासाठी निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी इंडिया आघाडी एकत्र उभी आहे. ही लढाई लोकशाही वाचविण्यासाठी असून आम्ही ती शेवटपर्यंत लढणार आहोत. -खा.बजरंग सोनवणे, बीड.**

मतचोरी प्रकरणी दि.११ ऑगस्ट रोजी इंडिया आघाडीच्या ३०० खासदारांनी संसदेचे मकरद्वार ते निवडणूक आयोग कार्यालयापर्यंत काढलेला मोर्चा दिल्ली पोलीसांनी आडविला. दरम्यान, या खासदारांमध्ये देशाचे नेते शरद पवार, राहूल गांधी, खा.सुप्रिया सुळे यांच्या खांद्याला खांदा लावून बीडचे खा.बजरंग सोनवणे आघाडीवर होते. यावेळी त्यांनी महाराष्ट्रात देखील मतदानाच्या आदल्या दिवशी मतदार यादीत नावे, समाविष्ठ केली जात होती, असा खळबळजनक आरोप केला.
इंडिया आघाडीच्या ३०० खासदारांनी संसदेचे मकरद्वार ते निवडणूक आयोग कार्यालयापर्यंत मोर्चा काढण्यास सुरुवात केल्यानंतर दिल्ली पोलिसांनी अडवला. खासदारांनी हातामध्ये 'सेव्ह व्होट'चे बॅनर घेतले होते. तथापि, दिल्ली पोलिसांनी सांगितले होते की इंडिया आघाडीने या मोर्चासाठी कोणतीही परवानगी घेतली नाही. बिहारमधील मतदार यादीतील अनियमिततेच्या आरोपावरून काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली ३०० विरोधी खासदारांनी दिल्लीत पायी मोर्चा काढला आहे. या मोर्चात बीडचे खासदार बजरंग सोनवणे आघाडीवर होते. तर संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचा १६ वा दिवस असून लोकसभेत प्रश्नोत्तराचा तास सुरू होताच विरोधी खासदारांनी गोंधळ सुरू केला. खासदारांनी 'वुई वॉन्ट जस्टिस'च्या घोषणा देत सभागृहाच्या वेलमध्ये पोहोचले. यानंतर सभापती ओम बिर्ला यांनी लोकसभा दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब केली. लोकसभा आणि राज्यसभेचे कामकाज सकाळी ११ वाजता सुरू झाले. लोकसभेत प्रश्नोत्तराचा तास सुरू असताना विरोधकांनी 'आम्हाला न्याय हवा आहे' अशा घोषणा दिल्या. यावेळी माध्यमांशी बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, इंडिया आघाडीचा मोर्चा निवडणूक आयोगावर आहे. मात्र, याआधी पोलीस बळाचा वापर करण्यात येत आहे. निवडणूक आयोगाला राहूल गांधींवर बोलण्याचा आधिकारी नसून कायदा हा निवडणूक आयोगाच्या घरचा नाही. त्यांनी भाजपसाठी काम करणे सोडावे. निवडणूक आयोग भाजपची बी टिम असल्याचा उल्लेखही खा.सोनवणे यांनी केला.

# मानवनिर्मित बायोमेट्रिक हजेरी प्रणाली व नवनिर्वाचित वर्ग मंत्रिमंडळ विस्तार उद्‌घाटन संपन्न

**केज । प्रतिनिधी**

जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग या शाळेमध्ये मानवनिर्मित बायोमेट्रिक हजेरी प्रणाली व नवनिर्वाचित वर्ग मंत्रिमंडळ विस्तार उद्घाटन दि.८ ऑगस्ट २०२५ वार शुक्रवार रोजी संपन्न झाले.या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा श्रीमती शैलाताई इंगळे व उद्घाटक म्हणून जीवन विकास शिक्षण मंडळ केज संस्थेचे सचिव श्री. जी.बी.गदळे सर हे उपस्थित होते.तसेच मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे या देखील उपस्थित होत्या.इयत्ता ७ वी अ चे वर्गशिक्षक प्रबोधकांत समुद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली वर्गातील सर्व विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे संपूर्णकार्य सुव्यवस्थित पार पाडले.पाहुण्यांचे स्वागत सुजनांचे स्वागत करूया चला या स्वागत गीताने करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रबोधकांत समुद्रे यांनी केले.उपक्रम निर्माण करताना घेतलेले परिश्रम त्यामध्ये त्यांना मिळालेले सहकार्य याबद्दल माहिती देत शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास बौद्धिक, मानसिक,शारीरिक, सामाजिक,भावनिक व नैतिक विकास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी या पैलून मधून साकार झालेली ही संकल्पना या उपक्रमांच्या माध्यमातून विकसित करण्याचा हा प्रयत्न असे त्यांनी सांगितले. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त,आत्मनिर्भरता हे गुण विकसित होतात असे ते म्हणाले. प्रस्ताविकानंतर पाहुण्यांच्या हस्ते या दोन उपक्रमांचे फीत कापून उद्घाटन करण्यात आले. मानवनिर्मित बायोमेट्रिक हजेरी प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांची दैनंदिन हजेरी घेतली जाते यामुळे वेळेची बचत होते,विद्यार्थ्यांना शिस्त लागते,विद्यार्थी आत्मनिर्भर बनतात. पुढे वर्ग मंत्रिमंडळ शपथविधी पार पडला त्यामध्ये आर्या लटपटे- मुख्यमंत्री,शौर्य बारगजे -उपमुख्यमंत्री,समृद्धी नेहरकर- गृहमंत्री, अपूर्वा सोनवणे-शिक्षणमंत्री,गुंजन घोळवे- शिक्षणमंत्री, श्रावणी लोंढे-नियोजन मंत्री,श्रेया धपाटे- आरोग्यमंत्री,किशोरी मुळे-वित्तमंत्री,सृष्टी अडसूळ- पर्यावरण मंत्री,सिद्धी क्षीरसागर-सांस्कृतिक मंत्री, संस्कृती गायकवाड- सांस्कृतिक मंत्री, तेजस्विनी कापरे- प्रसिद्धी मंत्री या वर्गमंत्र्यांनी शपथ विधी घेऊन कार्यभार स्वीकारला.विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा विद्यार्थ्यांमध्ये शिस्त रुजावी वेळेचे नियोजन हे गुण विद्यार्थ्यांमध्ये या उपक्रमांमधून रुजण्यास चालना



मिळते असे उद्गार करून वर्ग शिक्षकाचे अभिनंदन करून उद्घाटक श्री. जी.बी.गदळे सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.मुख्याध्यापक शिवनंदा मुळे मॅडम यांनी ही या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण होईल असे त्या म्हणाल्या.अध्यक्षीय समारोपामध्ये बोलताना श्रीमती शैलाताई इंगळे मॅडम असे म्हणाल्या की,पूर्ण शाळेने तुमच्या वर्गाचा आदर्श घ्यावा वर्षभर हा उपक्रम असाच सुरळीत चालावा उपक्रमातच नव्हे तर अभ्यासातही तुमचा वर्ग अव्वल असावा व त्यासाठी तुम्ही प्रयत्नशील राहावे असे त्या म्हणाल्या.सर्व वर्ग मंत्रिमंडळातील मंत्र्यांनी मान्यवरांच्या साक्षीने शपथ घेऊन आपला पदभार स्वीकारला.या सर्व कार्यक्रमामध्ये वर्ग शिक्षक समुद्रे पी.एस. यांचे मोलाचे असे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन सांस्कृतिक मंत्री सिद्धी क्षीरसागर हिने केले तर आभार दुसरी सांस्कृतिक मंत्री संस्कृती गायकवाड हिने मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077